# निरागस भावभावनांनी भारलेलं 'टपाल'!

## टपाल

सिनेक्षेत्रात अनेक वर्षं काम करणारी माणसं एकत्र आली की त्यातून काहीतरी चांगलं निष्पन्न होण्याची शक्यता बळावते. अशा एकत्र येणाऱ्या गटांचे आपले असे पिंड असतात. म्हणजे पठडीबाज व्यावसायिक सिनेमे बनवणारी माणसं.. किंवा सिनेमात सातत्याने वेगवेगळे प्रयोग करणारी माणसं.. वास्तवदर्शी सिनेमे बनवणारे काही जण.. असे बरेच. 'टपाल'ची टीम ही अनुभवी आणि वास्तवदर्शी सिनमे करणाऱ्यांमध्ये येते. यातली सर्व मंडळी वास्तवदर्शीच सिनेमे करतात, असं नाही. पण त्यांचं प्रमाण जास्त. मंगेश हाडवळे, नंदू माधव, वीणा जामकर, रोहित नागभिडे ही अशी यातली काही नावं. तर या सर्वांची मोट बांधलीय ती लक्ष्मण उतेकर यांनी. लक्ष्मण उतेकर हे नाव हिंदी इंडस्ट्रीला जुनं असलं तरी फार कमी मराठी लोकांना उतेकर यांची माहिती आहे. 'ब्ल्यू', 'बॉस', 'इंग्लिश विंग्लिश' अशा सिनेमांचं छायांकन त्यांनी केलंय. मेहनती कॅमेरामन अशी त्यांची ख्याती आहे. तर अशा उतेकर यांचा हा पहिला सिनेमा 'टपाल'. सिनेमाची कथा कुतूहलजनक आहे. एका प्रसंगातून सुरू झालेल्या या गोष्टीत इतर काही व्यक्तिरेखा येऊन मिळतात आणि त्यातून त्यातल्या विषयाला वळण लागतं. छायांकनाची उत्तम जाण असलेला दिग्दर्शक असल्याचा मोठा फायदा चित्रपटाला झाला आहे. त्यामुळे हा चित्रपट 'दिसतो' फारच आल्हाददायक. त्याला वापरलेली पिवळसर झाक यातल्या प्रत्येक व्यक्तिरेखेला देखणी बनवते. 'टपाल' 'पाहणं' ही एक 'ट्रीट' आहे. मघाशी सांगितल्याप्रमाणे यात दोन गोष्टी आहेत. यातली पहिली गोष्ट फारच निरागस आणि भन्नाट आहे. पुढे त्याला वळणही मिळतं. त्यानंतर गोष्ट गंभीर होते नक्की. पण ती ड्रॅमॅटिक न होता त्यातल्या गीत, प्रसंग, पार्श्वसंगीत आदींमुळे फारच 'मेलोड्रॅमॅटिक' होते. परिणामी पूर्वार्धाच्या तुलनेत दुसरा भाग रेंगाळतो.

ही सगळी गोष्ट एका छोट्या गावात घडते. या गोष्टीतला पहिला टप्पा आहे तो रंग्याचा. दहा-बारा वर्षांचा रंग्या उनाड आहे. शाळेपेक्षा बाहेर जास्त रमणारा. अल्लड. गावातल्याच पाटलाच्या धाकट्या मुलीवर, कुकीवर त्याचा विशेष जीव आहे. छोट्या-मोठ्या गोष्टीतून तिला इम्प्रेस करायचा त्याचा प्रयत्न सुरू असतो. गावात ना फोन ना टीव्ही. बाहेरच्या जगात काय घडतं हे गावकऱ्यांना कळतं ते टपालामधून. गावात देवराम मास्तर हे



पोस्टमन आहेत. पत्नी तुळसासह ते गावात रहातात. त्यांचा सगळ्या गावाशी परिचय. रंग्याही त्यांच्या आणि तुळसाशी तितक्याच परिचयाचा. मनातल्या भावना व्यक्त करण्यासाठी रंग्या कुकीला पत्र लिहितो आणि टाकतो पोस्टपेटीत आणि मग मात्र एक लफडं होऊन बसतं.

### थ्रीडी

**सौमित्र पोटे**
soumitra.pote@timesgroup.com

परिस्थिती इतकी टोकाला जाते की लिहिलेलं पत्र काही करून कुकीला मिळता कामा नये इतकी परिस्थिती येते. असा हा पहिला टप्पा. त्यानंतर ही गोष्ट मग रंग्या आणि कुकीची न उरता पुढे तो, मास्तर आणि तुळसा अशी होते. यातला हा दुसरा टप्पा. असे दोन टप्पे गाठत सिनेमा पुढे जातो.

यातली पहिली गोष्ट फारच इंटरेस्टिंग आहे. ती ठसवण्यासाठी निवडलेलं गाव, यातली माणसं, त्यांचे व्यवहार हे सगळं मजा आणतं. यातली प्रत्येक फ्रेम चित्र आहे. या संपूर्ण गोष्टीत रंग्याचा 'इनोसन्स' नायकाची भूमिका बजावतो. म्हणून पूर्वार्ध अवखळ असला तरी तो खिळवून ठेवतो. प्रसंगी चेहऱ्यावर हसू उमटवतो. गावातल्या गल्लीत खेळता खेळता रंग्याने 'व्हीआयपी'चा हेअरबँड लावणं हा यातला पहिला षटकार आहे. पूर्वार्धात करकचून बांधलेल्या पटकथेला उत्तरार्धात वळण मिळतं. त्यानंतर मात्र त्याची पकड काहीशी सैल होते. उत्तरार्धात ही गोष्ट बराचवेळी एकाच मुद्द्याभवती फिरत रहाते. त्याचवेळी पार्श्वसंगीतातून येणाऱ्या काव्यामुळे तो प्रकार फारच भडक होतो आणि तितकाच त्याचा परिणामही खाली येऊ लागतो. तरी हा प्रकार अति होण्यापूवीच सिनेमा पुढे जातो त्याचं समाधान आहे. यातलं रंग्या, कुकीचं गाणं चांगलं झालंय. यात रंग्याच्या भावना अधोरेगित होतात. त्यामुळे ते रंजक वाटतं. एकूण पार्श्वसंगीतही शेवट वगळता नेटकं झालंय. बॅकग्राउंडला येणाऱ्या कवितांमुळे हा घडणारा प्रकार स्पून फिडिंग होतो. छायांकन उत्कृष्ट आहे. संवादही सोपे, सुटसुटीत. दिग्दर्शकाला यातल्या कलाकारांनी उत्तम साथ दिलीय. पात्रनिवड अचूक असल्यामुळेच ते शक्य झालं. देवराम मास्तर (नंदू माधव), तुळसा (वीणा जामकर) या दोघांनीही अत्यंत समजुतीने, एकमेकांना अचूक साथ देत अभिनय साकारला आहे. वीणाला तर काही महोत्सवांमध्ये त्याबद्दल पारितोषिकही मिळालं आहे. या सिनेमातून रोहित उतेकर हा नवा कलाकार दिसला आहे. त्याच्या चेहऱ्यात दडलेला इनोसन्स आणि तितकाच गावरान खोडकरपणा दिग्दर्शकाने 'कॅश' केला आहे.

एकूणात, 'टपाल' पाहाणं ही ट्रीट आहे. टीमवर्क नेटकं आहे. प्रामाणिक प्रयत्नांनी उतेकर यांनी आपली पहिली कलाकृती बनवली आहे. थिएटरमध्ये जाऊन एकदा पाहायला हरकत नाही.

**निर्मिती:** मैत्रेय मास मीडिया
**संवाद, छायांकन, दिग्दर्शन:** लक्ष्मण उतेकर
**कथा, पटकथा:** मंगेश हाडवळे **संगीत:** रोहित नागभिडे
**कलाकार:** नंदू माधव, वीणा जामकर, रोहित उतेकर, मिलिंद गुणाजी, जयवंत वाडकर, केतकी सराफ, नंदू गाडगीळ, पुंडलिक धुमाळ, सुहास शिरसाट.
**दर्जा:**

# भावनिक, देखणे 'टपाल'



'टपाल' या चित्रपटाच्या शीर्षकावरूनच जुन्या काळाची सफर घडवून आणणारा चित्रपट आहे हे सहज लक्षात येते. १९७०च्या दशकातील ग्रामीण महाराष्ट्राचा काळ दाखविण्यात आलेल्या या चित्रपटात पत्राची आणि पर्यायाने पोस्टमनची आतुरतेने वाट पाहणारा समाज, प्रियजनांची पत्रानेच खालीखुशाली कळण्याच्या दिवसांत पोस्टमन, पोस्टमास्तरविषयी सर्वच लोकांना असलेला जिव्हाळा याचे चित्रण या चित्रपटात अप्रतिम करण्यात आले आहे. यापूर्वीही पोस्टमनशी संबंधित चित्रण हिंदी चित्रपटातून येऊन गेले असून त्या पलीकडे जाऊन दिग्दर्शकाने पोस्टमनच्या खासगी आयुष्यातील शल्य आणि एका निरागस मुलाची पत्र पाठवून झालेली गंमत अशा दोन गोष्टींची उत्तम गुंफण करीत दिग्दर्शकाने मानवी शल्य, निरागसता भावनिक पदर उलगडत अप्रतिमरीत्या चित्रपट साकारला आहे.

सुनील नांदगावकर

sunil.nandgaokar@expressindia.com

करमणूक करणारा परंतु आशयघन मराठी चित्रपटांची निर्मिती करणाऱ्या मंगेश हाडवळे यांची पटकथा असलेल्या 'टपाल' या चित्रपटाद्वारे हिंदीतील छायालेखक लक्ष्मण उतेकर प्रथमच दिग्दर्शक म्हणून प्रेक्षकांसमोर आले आहेत.

रंगा हा दहा-बारा वर्षांचा खोडकर मुलगा. त्याचे शाळेपेक्षा बाहेर भटकणे, हुंदडणे, खोड्या करणे याकडेच जास्त लक्ष. अवखळ, अल्लड वयातील रंगाला त्याच्याच वर्गातील कुकी ही मुलगी आवडते, तिच्याकडे सतत पाहात राहणे हा त्याचा आवडता छंदच बनलाय. रंगाचा कुकीवर जीव जडलाय. म्हणून तो एक दिवस तिला पत्र लिहितो आणि ते पत्र पत्रपेटीत टाकतो. परंतु, नंतर अशा काही गोष्टी घडतात की गावचे पोस्टमन देवराम मास्तरांना सांगून कुकीला पत्र पोहोचू नये अशी खटपट रंगा करतो. निपुत्रिक असल्यामुळे पोष्टमन देवराम मास्तर आणि खासकरून त्यांची पत्नी तुळसा यांचाही रंगावर जीव आहे. मुलाप्रमाणे त्याला घरी बोलावून खाऊ घालणे, त्याच्यावर माया करणे असे तुळसा करते. एकीकडे पत्र परत मिळावे म्हणून रंगाची खटपट आणि देवराम मास्तर व त्यांची पत्नी तुळसा यांचे आयुष्य आणि त्यातील घटना यांची बेमालूम सरमिसळ करीत चित्रपट पडद्यावर साकारतो.

रंगाचा अवखळ, अल्लडपणा, खोडकरपणा, त्याचे अल्लड वयातील कुकीवरचे प्रेम, तिच्यासमोर छान दिसण्यासाठी त्याची चाललेली खटपट, प्रसंगी त्यासाठी मारुतीच्या देवळातील रुपया ढापणे यातून निरागसतेची झलक दिग्दर्शकाने दाखवली आहे. रोहित उतेकर या बालकलाकाराने उत्तमपैकी रंगा साकारला आहे. तुळसाच्या भूमिकेतील वीणा जामकर आणि देवराम मास्तरच्या भूमिकेतील नंदू माधव यांनी नेहमीप्रमाणे व्यक्तिरेखा जिवंत केल्या आहेत. जयवंत वाडकर यांनीही पाटीलच्या छोट्याशा भूमिकेद्वारे आपल्या अभिनयाची झलक दाखवली आहे. त्या जोडीला सुहास शिरसाट, पुंडलिक घुमाळ, मिलिंद गुणाजी यांच्यासारख्या कलावंतांनीही आपापले काम चोख केले आहे. लावणीद्वारे ऊर्मिला कानेटकरनेही नृत्यभिनय कौशल्याची झलक चांगली दाखवली आहे.



दोन वेगवेगळ्या गोष्टींची गुंफण करताना चित्रपटाचे दोन भाग पडत असले तरीही अपेक्षित परिणाम करून निव्वळ निरागस विनोदी नव्हे तर गंभीर वळणावर नेऊन प्रेक्षकाला अंतर्मुख करण्यात पटकथाकार नक्कीच यशस्वी झाला आहे. कथनशैली आणि १९७०च्या काळातील गावाचे उत्तम चित्रण, अनेकदा चित्रचौकटींद्वारे भाव पोहोचविण्याचे कसब दिग्दर्शकाने दाखविले आहे.

सुरुवातीपासून शेवटापर्यंत प्रेक्षकाला खिळवून ठेवण्यात चित्रपट नक्कीच यशस्वी झाला आहे. उत्तम छायाचित्रण, उत्तम अभिनय, अचूक पात्रनिवड आणि दोन गोष्टींचे मिश्रण करून एकाच वेळी नर्मविनोदी तरी गंभीर प्रकारचा चित्रपट बनविता येऊ शकतो याचे दर्शन हा चित्रपट घडवितो. हे टपाल देखणे, भावनिक आहे.

